# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

## आचार्य अत्रे रंगमंदिर

## (म्यॅन्युअल क्रं. ५)

## कामकाज कार्यवाही करण्यासाठी कर्मचाऱ्यांकडून वापरण्यात येणारे

## नियम, अटी, निर्देश, नियमावली आणि अभिलेख

## प्रपत्र

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका रंगमंदिर वापराबाबतचे धोरण

१) <u>संक्षिप्त नाव व प्रारंभ -</u>

अ) सदरच्या धोरणास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आचार्य अत्रे रंगमंदिर वापराबाबतचे धोरण असे संबोधण्यात येईल.

आ) सदरचे धोरण हे नियम अस्तित्वात येईपर्यंत अमंलात राहील.

२) <u>व्याख्या –</u>

१). या धोरणातील विषयास अगर संदर्भात काही बाधा येत असेल तर.......

अ) "कायदा" म्हणजे मुंबई प्रंतिक महानगरपालिका अधिनियम १९४९

ब) "कलम" म्हणजे कायद्यातील कलम

क)"आयुक्त" म्हणजे कलम ३६ अन्वये नेमलेला शहराचा नगरपालिका आयुक्त अथवा कलम ३९ अन्वये नेमलेला हंगामी आयुक्त.

ड) "व्यवस्थापक" म्हणजे रंगमंदिराचे व्यवस्थापनासाठी कलम ५१(४) अन्वये महाराष्ट्र शासनाकडून पद मंजूर करुन घेऊन अधिनियमांचे कलम ५३(१) अन्वये नेमणेत आलेला अधिकारी.

इ) "रंगमंदिर" म्हणजे महापालिकेच्ज्ञ ज्या इमारतीचा वापर नाट्यप्रयोग व सांस्कृतीक कार्यक्रमांसाठी केला जातो अशी

इमारत.

२). “शब्द” आणि “शब्दप्रयोग” याचा या धोरणात उपयोग केला आहे. परंतु त्यांची व्याख्या केली नाही. त्या शब्द आणि शब्दप्रयोग यांचा कायद्यात सांगितलेला अर्थ अभिप्रेत राहील.

३). रंगमंदिराचा / प्रेक्षागृहाचा वापर –

१) रंगमंदिराचा वापर हा नाट्यप्रयोग व सांस्कृतीक कार्यक्रम यासाठी करता येईल. यामध्ये नाट्यप्रयोग, ऑर्केस्ट्रा, जादुचे प्रयोग, व्याख्याने, सत्कार समारंभ, प्रवचने शाळांचे स्नेहसंमेलन,विविध गुणदर्शन, मराठी गितांचा कार्यक्रम, नृत्याचा कार्यक्रम, कविता वाचन व गायन, वादन, एकपात्री प्रयोग इत्यादी बाबींचा समावेश राहील. तथापि या व्यतिरिक्त आयुक्त जे कार्यक्रम सांस्कृतिक कार्यक्रम म्हणून निर्णय देतील त्यांचाही समावेश सांस्कृतिक कार्यक्रमात राहील.

२) रंगमंदिर वापरासाठी सकाळी ९ ते रात्री १२:३० पर्यंत खुले राहील.

पहिला प्रयोग : दुपारी १२.०० ते ०३.०० वाजेपर्यंत
दुसरा प्रयोग : सायंकाळी ०५.०० ते ०८.०० वाजेपर्यंत

तिसरा प्रयोग : रात्री ०९.३० ते १२.३० वाजेपर्यंत

रंगमंदिर वापराच्या एकूण कालावधीच्या वेळेपेक्षाही इतर वेळी कार्यक्रम होणार असल्यास कार्यक्रम सादर करणाऱ्या अर्जदाराने

अथवा संस्थेने त्या संदर्भात धोरण क्र. ९(०२) मध्ये नमूद केलेप्रमाणे सर्व परवाने तसेच याबाबत पोलिस कमिशनर यांचा स्वतंत्र व स्पष्ट परवाना काढला पाहिजे.

४) <u>रंगमंदिराचे अनामत व भाडे व इतर आकार –</u>

रंगमंदिराची अनामत, भाड्याची रक्कम व इतर आकार व परतीची अनामत रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा. आयुक्त यांचेकडून वेळोवेळी निश्चित करणेत येईल.

५) <u>जादा तिकीट दरा नुसार आकारावयाचे भाडे –</u>

सर्वसाधारण तिकीट दरानुसार रंगमंदिर / नाट्यगृह वापरासाठी म.न.पा. ने ठरविलेली भाडयाची रक्कम ही जर एखाद्या प्रयोगासाठी सर्वसाधारण तिकीट दरापेक्षा जास्त दराची तिकीटे विक्रीस ठेवल्यास

सर्वसाधारण तिकीट दरापेक्षा जास्त होणाऱ्या तिकीटांच्या किमतीच्या प्रमाणात २५% दराने भाड्याची रक्कम जास्त आकारणेत येईल.

कार्यक्रमासाठी अधिक दराची तिकीट विक्री करावयाची असल्यास त्यासाठी व्यवस्थापकांची आगाऊ परवानगी घेतली पाहिजे.

६) <u>रंगमंदिराचे भाड्यात सवलत देणे –</u>

१) पिंपरी चिंचवड शहरातील रजिस्टर बालनाट्य संस्था, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, प्रायोगिक नाट्यसंस्था यांना गुरुवार, शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्यांचे दिवस सोडून इतर दिवशी प्रयोग करणेसाठी रंगमंदिराचे विहित केलेल्या भाड्यात २०% सवलत देणेत येईल.

२) मराठी संगीत नाटकासाठी महिन्यातून दोन वेळा ( दोन खेळ ) प्रचलित रंगमंदिराच्या भाड्याच्या दरामध्ये ५० % सवलत देणेत येईल.

७)<u>रंगमंदिर राखून ठेवण्याची पध्दत –</u>

१). रंगमंदिराचे आरक्षण प्रत्येक तिमाहीसाठी केले जाईल.

तिमाही कालावधी व अर्ज सादर करण्याचा कालावधी खालीलप्रमाणे राहील.

| तिमाही कालावधी | अर्ज करणेची मुदत |
|---|---|
| • जानेवारी ते मार्च | नोव्हेंबर |
| • एप्रिल ते जून | फेब्रुवारी |
| • जुलै ते सप्टेंबर | मे |
| • ऑक्टोबर ते डिसेंबर | ऑगस्ट |

२). रंगमंदिराचे मागणीसाठी अर्जदाराने अथवा संस्थेने विहित केलेल्याछापील अर्जामध्ये संपूर्ण माहितीसह अर्जावर विहित केलेल्या मुदतीत व्यवस्थापकाकडे सादर केला पाहिजे. त्यानुसार प्राप्त झालेले अर्ज कोणतेही कारण न देता अंशत: अथवा पूर्णत: नामंजूर करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांनी राखून ठेवला आहे. त्यानुसार होणारा मंजूर अर्ज हा आगाऊ आरक्षण म्हणून समजण्यात येईल. परंतु उपरोक्त व्यतिरिक्त रंगमंदिर उपलब्ध असल्यास ते देण्याचे अथवा नाकारणेचे अधिकार व्यवस्थापकास राहतील.

३) अर्जदाराने अथवा संस्थेने प्रयोगाच्या नेहमीच्या वेळाव्यतिरिक्त इतर वेळी रंगीत तालमीसाठी रंगमंदिर मागणीसाठी महापालिकेने विहित केलेल्या छापील अर्जामध्ये संपूर्ण माहितीसह अर्ज १५ दिवस अगोदर व्यवस्थापकाकडे सादर केला पाहिजे.

४) तथापी नियम क्र. ७ (३) मध्ये नमूद केलेल्या व्यतिरिक्त जर रंगमंदिर प्रयोगाचे नियोजित वेळेत रिक्त असेल अशा वेळीही मागणी आल्यास रंगीत तालमीसाठी उपलब्ध होईल.

५) नियम क्र. ७(३) व ७ (४) मध्ये नमूद केलेप्रमाणे रंगीत तालीमीसाठी आलेल्या अर्जानुसार रंगमंदिर उपलब्ध करण्याचे अधिकार व्यवस्थापकास राहतील. परंतु रंगीत तालमीसाठी आलेल्या मागणीनुसार लगतचे दिनांकास

रंगमंदिर रिक्त असल्यास व सदर वेळेत इतरांची मागणी नसल्यास त्यासाठी अर्ज करण्यासाठी १५ दिवसांच्या मुदतीचे बंधन असणार नाही.

६) अर्जासोबत आरक्षणापोटी विहित केलेली अनामत रक्कम भरावी लागेल एकदा भरलेली अनामत रक्कम परत न मागितलेस व ती सुरक्षीत असलेस तीच रक्कम पुढे अनामत रक्कम म्हणून ग्राह्य धरणेत येईल. अनामत रक्कम जप्त झाल्यास पुढील प्रयोगासाठी विहित केलेली अनामत रक्कम अर्जदाराने पुन्हा न भरल्यास अर्जदारास दिलेल्या पुढील तारखा रद्द झाल्याचे समजणेत येईल.

७) मागणी अर्जाचा निर्णय अर्जदारास शक्य तितक्या लवकर लेखी कळविला जाईल. त्यानंतर अर्जदाराने प्रयोगाच्या / रंगीत तालमीच्या प्रमाणात भाड्याची संपूर्ण रक्कम प्रयोग / रंगीत तालीम दिनांकापूर्वी किमान एक आठवडा अथवा प्रयोग / रंगीत तालमीपूर्वी संबंधीत रंगमंदिराचे व्यवस्थापकाकडे भरली पाहिजे. भाड्याची संपूर्ण रक्कम प्रयोग / रंगीत तालीम दिनांकापुर्वी किमान एक आठवडा अथवा प्रयोग / रंगीत तालमीपुर्वी संबंधित रंगमंदिराचे व्यवस्थापकाकडे न भरल्यास रंगमंदिर सदर दिनांकाला इतरास देण्याचा अधिकार व्यवस्थापकास राहिल. मागणी केलेल्या दिनांकास कार्यक्रम होणार नसल्यास प्रयोग दिनांकाचे सात दिवस आगोदर संबंधित अर्जदाराने सदरची दिनांक सोडून दिल्याबद्दल व्यवस्थापकास लेखी कळविले पाहिजे.

८)<u>रंगमंदिर उपलब्धता –</u>

१) एका अर्जदारास किंवा  संस्थेस प्रयोगासाठी रंगमंदिर जास्तीत जास्त सलग ७ दिवस भाड्याने मिळेल.

२) अर्जदार किंवा संस्थेस रंगमंदिर प्रयोगापूर्वी एक तास अगोदर उपलब्ध केले जाईल. व प्रयोगानंतर अर्धा तासात ते अर्जदार / संस्थेने रिकामे करुन दिले पाहिजे.

३) प्रयोगाच्या नेहमीच्या वेळेव्यतिरिक्त इतर वेळी रंगीत तालमीसाठी रंगमंदिर अर्जदार किंवा संस्थेस दोन तासाकरिता उपलब्ध होऊ शकेल.

९)<u>रंगमंदिर वापराच्या अटी व शर्ती –</u>

१)रंगीत तालमीसाठी रंगमंदिर वातानुकुलीत व्यवस्था (एअर कंडीशनींग ) असणार नाही. फक्त सर्वसाधारण प्रकाश योजना राहील.

२)रंगीत तालमीच्या वेळी रंगमंदिरात सदर संस्थेचे पदाधिकारी व संबंधीत व्यक्तीशिवाय इतरास प्रवेश दिला जाणार नाही. ही संख्या दोन्ही मिळून ३५ पेक्षा जास्त नसावी.

३)रंगमंदिरात होणारा कोणताही कार्यक्रम सरकारी नियम पाळून वेळेवर सुरु करावा. तसेच तो सुरु झाल्यापासून जास्तीत जास्त काळ चालू न ठेवता वेळेत संपविण्याचे बंधन राहील

४) ठरवून दिलेल्या वेळेत प्रयोग संपविण्याची जबाबदारी अर्जदारावर राहील. वीज पुरवठा बंद पडल्यास किंवा तत्सम अपरिहार्य कारणासाठी उशीर झाल्यास तेवढा वेळ शक्य असेल तरच वाढवून देण्यात येईल. मात्र याप्रमाणे ठरवून दिलेल्या वेळेपेक्षा अधिक काळ रंगमंदिराचा वापर झाल्यास प्रत्येक ज्यादा तासासाठी ठरवून दिल्याप्रमाणे ज्यादा आकार अर्जदारास व्यवस्थापकाकडे भरावा लागेल.

५) रंगमंदिर ज्या अर्जदारास वापरावयास दिले आहे अशा अर्जदारास व्यवस्थापकाचे पूर्व परवानगी शिवाय दिलेली परवानगी दुसऱ्याचे नावावर वर्ग करता येणार नाही. अथवा रंगमंदिर वापरासाठी दिलेल्या तारखा व वेळाही आपआपसात व्यवस्थापकाचे पूर्व परवानगीशिवाय बदलता येणार नाही. याकामी व्यवस्थापकांनी मा. आयुक्त ठरवतील ती फी अर्जदाराकडून वसुल केल्यानंतरच हस्तांतरणास परवानगी देण्यात येईल.

६) कोणत्याही कार्यक्रमासाठी लागणारे साहित्य, उपकरणे इत्यादी बाबींची लेखी मागणी अर्जदाराने प्रयोगापुर्वी केली पाहिजे. अर्जदाराने मागणी केलेल्या साहित्यापैकी जे साहित्य उपलब्ध व देणे शक्य असेल ते प्रयोगाचे वेळी देण्याची व्यवस्था केली जाईल. मात्र यासाठी ठरलेला ज्यादा आकार अर्जदाराने प्रयोगापूर्वी व्यवस्थापकाकडे रोख भरला पाहिजे.

७) रंगमंदिर ताब्यात दिल्यापासून ते रिकामे करुन देईपर्यंतच्या वेळेत त्याची खराबी अगर नुकसानी होणार

नाही. याची जबाबदारी अर्जदारावर राहील. जर इमारतीची अगर त्यातील फर्निचर,फिटींग्ज पेंटीग्ज विजेची उपकरणे अगर इतर साधनसामुग्री यांची काही खराबी अगर नुकसानी झाल्यास त्याची जबाबदारी अर्जदारावर राहील. व त्याबद्दल मा. महापालिका आयुक्त ठरवतील ती नुकसान भरपाई अर्जदारास भरुन द्यावी लागेल. परतावा तत्वावर भरलेल्या अनामतीमधून अगर त्यापेक्षा जास्त झालेस रोखीने व्यवस्थापकाकडे भरावी लागेल.

८) रंगमंदिरात होणाऱ्या प्रयोगामुळे इतर कोणाच्या हक्कांचा भंग झाला असेल तर त्याची जबाबदारी अर्जदारावर राहील.

९) रंगमंदिराचा उपयोग करणेसाठी अर्जदारास दिलेली परवानगी रंगमंच, रंगपट, रंगमंदिर व यांच्यशी संबंधीत मार्ग व परिसर एवढ्या पुरतीच मर्यादित राहिल. इमारतीच्या इतर भागात प्रवेश मिळण्याचा अधिकार या परवानगीने अर्जदारास अगर कार्यक्रमाशी संबंधीत असलेल्या इतर कोणासही प्राप्त होत नाही. मात्र प्रयोगाचे कालावधीत महापालिकेचे आयुक्त, अति.आयुक्त अगर त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी यांना रंगमंदिराचे कोणत्याही भागास भेट देता येईल व त्यास अर्जदारास प्रतिबंध करता येणार नाही.

१०) रंगमंदिरात उपलब्ध असलेल्या सुविधा कार्यक्षम ठेवण्याच्या सर्वतोपरी प्रयत्न केला जाईल. परंतु काही अपरिहार्य कारणामुळे त्यात काही बिघाड झाल्यास त्याची जबाबदारी व्यवस्थापकावर राहणार नाही. तसेच या

बिघाडामुळे निर्माण होणाऱ्या अडचणीस व नुकसानीस महापालिका जबाबदार राहणार नाही.

११) रंगमंदिरात उपलब्ध असलेल्या आसन संख्येपेक्षा अधिक व्यक्तींना प्रेक्षक म्हणून प्रवेश देता येणार नाही. तसेच उपलब्ध आसन व्यवस्थेपेक्षा जास्त आसनांची सोय करता येणार नाही. उपलब्ध आसन संख्येपैकी रंगमंचाजवळील पहिल्या ओळीतील २ आसने परिनिरिक्षण मंडळाचे (सेंन्सॉर बोर्ड) प्रतितिधीसाठी तसेच त्यामागील तीन ओळीवर प्रत्येकी दोन याप्रमाणे सहा आसने (सर्वसाधारण मध्यावत) महापालिकेसाठी राखून ठेवणेत येतील. त्याचा वापर तिकिटे विक्रीसाठी करता येणार नाही.

१२) रंगमंदिरात थुंकणे, घाण करणे, धुम्रपान करणे, बेशिस्त किंवा आक्षेपार्ह वर्तन करणे, रंगमंदिरातील वस्तुची खराबी करणे या गोष्टींना मनाई राहील. अशी बाब निदर्शनास आल्यास त्याबद्दल नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी अर्जदारावर राहील.

१३) रंगमंदिरातील आवारात कँटीन उपलब्ध असल्यास अर्जदारास बाहेरुन खाद्यपदार्थ व पेये परस्पर आणता येणार नाहीत. तसेच हे खाद्यपदार्थ व पेये रंगमंदिराच्या प्रवेश मार्गात दळण वळणाच्या मार्गात रंगमंचाच्या प्रवेश मार्गात किंवा रंगमंदिरात आणून पुरविता येणार नाही. तथापि व्यवस्थापकाची विशेष परवानगी घेऊन अर्जदारास बाहेरुन खाद्द्पदार्थ व पेये आणता येतील व व्यवस्थापकाने सुचना केल्याप्रमाणे त्याच संबंधीत ठिकाणी त्याचा उपयोग

करता येईल. परंतु त्याबाबत नुकसाण भरपाई मागण्याचा हक्क कोणासही राहणार नाही.

१४) कार्यक्रमाच्या जाहिरातीचे फलक रंगमंदिरावर त्यासाठी ठरवुन दिलेल्या जागेवरच लावता येतील . जाहिरातीचे बोर्डस रंगमंदिराचे राहतील व त्यावरील मजकुर रंगमंदिराने नियुक्त केलेल्या पेंटर कढून लिहुन घेतला जाईल व त्यासाठी अर्जदारास प्रत्येक बोर्ड मागे ठरविणेत आलेला आकार द्यावा लागेल. कार्यक्रम प्रसिध्दिचा फलक कार्यक्रमाचे चार दिवस आगोदर लावण्यात येईल. फलकावर लिहावयाचा मजकुर स्वच्छ अक्षरात लिहुन अर्जदाराचे सहिने कार्यक्रमापुर्वी १० दिवस अगोदर व्यवस्थापकाकडे दिला पाहिजे.

१५) अर्जदारास रंगमंदिराच्या प्रवेशद्वारा जवळ किंवा त्या परिसरात कोणत्याही प्रकारच्या वाद्य वादनाची व ध्वनिक्षेपकांची योजना पूर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.

१६) कार्यक्रमासाठी आवश्यक असणारे कलावंत रंगमंच व रंगपट या ठिकाणी कामासाठी लागणारे सहाय्यक यांना योग्य ते बिल्ले किंवा प्रवेश पत्रीका अर्जदाराने दिल्या पाहिजेत. असे बिल्ले किंवा प्रवेश पत्रीका असणाऱ्यांनाच प्रवेश दिला जाईल.

१७) रंगमंदिरातील कार्यक्रमाच्या वेळी रहदारीच्या नियंत्रणाखाली तसेच कार्यक्रमाच्या वेळी कायदा सुव्यवस्थेचे उलंघन होऊ नये याद्दष्टीने जरुरीप्रमाणे पोलीस मदतीची व्यवस्था अर्जदाराने केली पाहिजे. मात्र अशी

व्यवस्था अर्जदाराने केली नसेल तर कोणत्याही कारणास्तव पोलीस मदतीची जरुरी भासल्यास व्यवस्थापक पोलीस मदत मागवतील व त्याचा खर्च अर्जदारास द्यावा लागेल.

१८) कार्यक्रमाच्या वेळी प्रेक्षकांना त्यांच्या जागा दाखविण्यासाठी स्वयंसेवकाची (डोअरकिपर) सोय महापालिकेतर्फे केली जाईल. व त्यासाठी अर्जदारास दर प्रयोगासाठी ठरविण्यात आलेली रक्कम भाड्यासोबत भरावी लागेल.

१९) कार्यक्रमाची तिकीटे विकण्यासाठी जागा राखून ठेवली आहे. त्या जागेचा उपयोग अर्जदारास कार्यक्रम दिनांक धरुन चार दिवस आगोदर करता येईल. तिकीटे विक्रीसाठी विक्रीचे काम नियमानुसार सुरळीतपणे होत आहे किंवा कसे हे पाहण्याचे अधिकार व्यवस्थापक यांना आहेत. ते ज्या सुचना वेळोवेळी देतील त्याची अंमलबजावणी तिकीट विक्रेत्यांनी केली पाहिजे. तिकीट विक्रीच्या व्यवस्थेबाबत अर्जदारास प्रामुख्याने जबाबदार धरले जाईल.

२०) कार्यक्रमासाठी लागणारे सर्व प्रकारचे सरकारी व म.न.पा. चे परवाने ( प्रिमायसेस, लायसेन्स, परफॉर्मस लायसेन्स, तिकीट सेलींग लायसेन्स इ.) तसेच लेखकाची लेखी परवानगी अर्जदाराने प्रयोग दिनांकापूर्वी तीन दिवस मिळवून ते व्यवस्थापकास दाखविले पाहिजे. तसेच या कार्यक्रमाच्या जाहीरातीचे बोर्डस लावण्याची व कार्यक्रमासाठी भरावा लागणारा कर महानगरपालिकेत /

पोलिस खात्याकडे वेळेत भरण्याची जबाबदारी अर्जदारावर राहील.

२१) रंगमंदिरात राहण्याची व्यवस्था उपलब्ध असल्यास व नाटक कंपन्यांना आवश्यक भासल्यास त्यासाठी ठरविण्यात आलेल्या दरानुसार आकार घेणेत येईल. मात्र या जागेत कोणासही स्वयंपाक करता येणार नाही. आकारासाठी किंवा रंगमंदिर प्रवेशापासून मोजला जाईल. राहण्याच्या व्यवस्थेसाठी एकापेक्षा अधिक नाटक कंपनींना एकाच वेळी मागणी केली असता परगावच्या नाट्य कंपनीस याबाबत प्रथम प्राधान्य देणेत येईल.

२२) अपरिहार्य कारणासाठी कारण न देता दिलेली तारीख रद्द करण्याचा व प्रयोग बंद करण्याचा अधिकार व्यवस्थापकास राहील. परंतु व्यवस्थापकाकडून अशी सूचना प्रयोगाच्या तारखेपूर्वी पाच दिवस आगोदर दिली जाईल. व या कामी अर्जदारास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

२३) रंगमंदिराचे व्यवस्थापक हे मा. महापालिका आयुक्त, अति.आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली या रंगमंदिराची व्यवस्था व दैनंदिन कारभार पाहतील.

१०)<u>अनामत भाडे परतावा –</u>

१) प्रयोगानंतर अर्जदाराने अनामत रक्कम परत मिळणेकरीता अर्ज केल्यास सदरची अनामत रक्कम त्यास परत मिळू शकेल.

२) मागणी केलेल्या दिनांकास कार्यक्रम होणार नसल्याने सदरचा दिनांक परत करीत आहे. असे अर्जदाराने प्रयोग दिनांकाचे ७ दिवस आगोदर कळविल्यास अनामत रक्कम पुढील कार्यक्रमासाठी सुरक्षित राहील.

३) कार्यक्रम/रंगीत तालमीपूर्वी भाड्याची रक्कम न भरलेस जमा केलेली अनामत रक्कम जप्त करणेत येईल.

४) अ) ऐखाद्या अर्जदारास ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या कार्यक्रमासाठी काही अपरिहार्य नैसर्गीक आपत्तीमुळे रंगमंदिराचा वापर करता आला नाही तर १०% सर्व्हिस चार्जेस वजा जाता उर्वरीत अनामत व भाड्याची रक्कम परत करण्यात येईल.

ब) तसेच शासकीय कारणास्तव दिलेली परवानगी रद्द करावी लागली व अर्जदारांना रंगमंदिराचा वापर करता आला नाही तर त्यांना प्रयोगासाठी नंतरची तारीख दिली जाईल. अगर अर्जदाराचे इच्छेनुसार त्यांना १० % सर्व्हिस चार्जेस वजा करुन उर्वरीत भाडे व अनामत रक्कम परत करण्यात येईल.

क) तसेच काही अपरिहार्य कारणास्तव महापालिकेतर्फे प्रयोग रद्द करण्यात आला तर याकामी अर्जदाराने भरलेली

डिपॉझीट व भाड्याची रक्कम १० % सर्व्हिस चार्जेस वजा करुन परत करण्यात येईल.

५) रंगीत तालमीसाठी आरक्षीत केल्याप्रमाणे रंगमंदिराचा वापर न झाल्यास सदरची भाड्याची रक्कम अर्जदारास परत केली जाणार नाही. तथापी अर्जदाराने विनंती केल्यास त्याच भाड्यापोटी पुढील उपलब्ध तारखेला रंगीत तालमीसाठी परवानगी देण्यात येईल.

६)ठरवून दिलेल्या वेळेपेक्षा अधिक काळ वापर झाल्यास त्यापोटी होणारा ज्यादा आकाराची रक्कम अनामत रकमेतून वसुल करणेत येईल.

७)रंगमंदिर इमारतीचा अगर त्यातील फर्निचर, फिटींग्ज, पेंटीग्ज, विजेची उपकरणे अगर इतर साधनसामग्री यांची काही खराबी अगर नुकसान झाल्यास सदरची नुकसान भरपाई अनामत रकमेतून वसूल करणेत येईल.

८)आवश्यकता भासल्यास रंगमंदिराचे व्यवस्थापकाने मागविलेल्या पोलिस मदतीच्या खर्चाची रक्कम अनामत रकमेतून वसूल केली जाईल.

९)वर नमूद केलेल्या अ.क्र. ४ ते ८ मधील बाबींसाठी होणाऱ्या खर्चाची रक्कम
ही अनामत रकमेपेक्षा जास्त असल्यास सदरची रक्कम अर्जदाराने त्वरीत व्यवस्थापकाकडे रोख स्वरुपात भरली पाहीजे.

११) <u>नाट्यसंगीत महोत्सव –</u>

महानगरपालिकेच्या क्षेत्रात कलेचा विकास व्हावा उत्तम नाट्यसंस्था व कलावंत निर्माण व्हावेत, प्रेक्षक वर्ग निर्माण व्हावा, याद्दष्टीने नाट्यसंगीत महोत्सव रंगमंदिरात आयोजित करणेत येईल. सदर महोत्सवानुसार कार्यक्रम आयोजित करणे, त्याबाबतचे

नियोजन करणे, रक्कम स्विकारणे व खर्च करणे इ. अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

१२) <u>रंगमंदिर वापराच्या नियंत्रणाचे अंतिम अधिकार –</u>

१) रंगमंदिर वापराबद्दलच्या धोरणात आवश्यक वाटेल तेव्हा बदल करण्याचा अधिकार महापालिकेस राहील. हे बदल रंगमंदिराच्या वापर करणाऱ्यावर बंधनकारक राहतील.

२) या धोरणाच्या अर्थाबद्दल व रंगमंदिराच्या वापराबाबत कोणत्याही बाबतीत अर्जदार व व्यवस्थापक यांच्यात मतभेद झाल्यास त्यासंबंधी मा. महापालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील व तो दोघांवरही बंधनकारक राहील.

१३) <u>अडचणींचे प्रसंगी आयुक्तांचे अधिकार –</u>

या धोरणान्वये रंगमंदिर वापराबाबत / उपलब्धतेबाबत अगर तत्संबंधी कोणताही अडचण उद्भवल्यास आयुक्तांस आवश्यक वाटेल अशी धोरणाशी विसंगत नसलेली कोणतीही योग्य कारवाई करता येईल.

सही /-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८